महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.८३२ No 11881
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३
दिनांक : 21 APR 2011

# परिपत्रक

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

.....

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत विविध परिपत्रकांद्वारे निर्देश देण्यात आले आहेत.

२. महिलांच्या लैंगिक सतावणुकी संदर्भातील तक्रारींची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीत अशासकीय महिला सदस्यांच्या नियुक्तीबाबतच्या सुचना महावितरण कंपनीच्या सर्व कार्यालयांना प्रशासकीय परिपत्रक क्र.३०५ दि.०४.०८.२०१० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. तरी याद्वारे पुन्हा सर्व कार्यालय प्रमुखांचे लक्ष प्रशासकीय परिपत्रक क्र.३०५ दि.०४.०८.२०१० कडे वेधण्यात येत असून त्यांना विनंती करण्यात येते की, त्यासोबत जोडलेल्या शासन परिपत्रक क्र.मकक-२०१०/प्र.क्र.४६/मकक दिनांक ११ जून २०१० मध्ये दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे आणि महिलांवरील लैंगिक अत्याचार व सतावणुकीस प्रतिबंध बसेल असे पहावे.

४. सदर परिपत्रक म.रा.वि.वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(विजय भि. बागुल)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालय स्तरापर्यंत व
निगम कार्यालयातील सर्व विभागप्रमुख व कक्ष प्रमुख

*D:\O&M\Circular - F.N.. 832-Sexual Harrasment.doc*
*20/4/11*